
ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २२५ • गुरुवार दि.४ जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## नांदेड विधानपरिषद निवडणूक: भाजपचे राजूरकर,महाविकास आघाडीचे आष्टीकर,वंचितकडून इंगोले निवडणूक रिंगणात

### काँग्रेसचे सुमठाणकरसह पाच जणांनी उमेदवारी अर्ज घेतला मागे





नांदेड/प्रतिनिधी-नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या आज (गुरुवार) शेवटच्या दिवशी पाच जणांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. या मतदारसंघात तिरंगी लढत होणार असून भाजप तथा महायुतीकडून माजी आ.अमरनाथ राजूरकर, महाविकास आघाडी तथा उबाठा सेनेचे कृष्णा पाटील आष्टीकर व वंचित बहुजन आघाडीचे प्रशांत इंगोले हे निवडणूक रिंगणात आहेत.

राज्यातील १७ विधानपरिषदेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी बैठकांचे सत्र व चर्चांच्या फैऱ्या सुरुच होत्या. माजी मुख्यमंत्री खा.अशोक चव्हाण व राष्ट्रवादी काँग्रेसचे आ.प्रताप पाटील चिखलीकर हे दोन राजकीय विरोधक एकत्र येवून त्यांनी आज पत्रकार परिषद घेत महायुती मजबूत असल्याची ग्वाही दिली. आ.चिखलीकर यांचे पुत्र प्रविण पाटील चिखलीकर यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. त्यामुळे भाजपच्या गोटात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. दुसरीकडे महाविकास आघाडीमध्ये दोन दिवसांपासून चर्चा व बैठकांचे सत्र सुरुच होते. वरिष्ठ नेत्यांच्या आदेशानंतर काँग्रेसचे उमेदवार रामदास पाटील सुमठाणकर यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. महाविकास आघाडीकडून उबाठा सेनेचे कृष्णा पाटील आष्टीकर हे निवडणूक रिंगणात आहेत. वंचित बहुजन आघाडीकडून प्रशांत इंगोले यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवसी काँग्रेसचे रामदास पाटील सुमठाणकर, माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर, पान ४ वर

### नांदेडचे शेअरमार्केट कोसळले

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रविण पाटील चिखलीकर यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने भाजपला अवघड असणारी ही निवडणूक आता सोपी झाली आहे. चिखलीकर यांच्या उमेदवारी मागे घेतल्यामुळे नांदेडच्या शेअरमार्केट मधील भाव आज चांगला कोसळला आहे. निवडणुकीसाठी मतदार असलेले नगरसेवक हे नांदेडच्या शेअरमार्केटकडे लक्ष देवून बसले होते. आता आपली फक्त बोळवणच होणार अशी प्रतिक्रिया काही मतदारांनी व्यक्त केली.

## कट्टर विरोधक खा.अशोक चव्हाण व आ.प्रताप पा.चिखलीकर एकत्र

### महायुतीचा धर्म पाळण्याची दिली ग्वाही



नांदेड/प्रतिनिधी-नांदेडच्या राजकारणात कट्टर विरोधक म्हणून ओळखले जाणारे भाजपचे नेते खा.अशोक चव्हाण व राष्ट्रवादी काँग्रेसचे आ.प्रताप पाटील चिखलीकर हे विधानपरिषद निवडणुकी-निमित्त एकत्र आले आहेत. दोन्ही नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेवून नांदेड विधानपरिषद मधील महायुतीचे उमेदवार अमरनाथ राजूरकर यांच्या विजयाची ग्वाही दिली. निवडणुकीतून आ.चिखलीकर यांचे पुत्र प्रविण पाटील चिखलीकर यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे.

वसंतनगर येथील आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या निवासस्थानी भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांच्या उपस्थितीत पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषदेला महायुतीतील घटक पक्ष असलेल्या शिवसेना (शिंदे) पक्षाचे आमदार व पदाधिकारी उपस्थित नव्हते.

या पत्रकार परिषदेत बोलतांना खा.अशोक चव्हाण म्हणाले की, विधानपरिषदेच्या १७ जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार हे वरिष्ठ नेते प्रयत्नशील आहेत. महायुतीचे जागा वाटप ३१ मे पर्यंत होवू शकले नाही. त्यामुळे अनेकांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. महायुतीच्या जागा वाटपात नांदेड विधानपरिषदेची जागा भाजपला सुटली आहे. महायुतीचे उमेदवार म्हणून अमरनाथ राजूरकर हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. वरिष्ठ नेत्यांनी घेतलेल्या निर्णयाची स्थानिक पातळीवर घटक पक्षांनी अंमलबजावणी करायला पाहिजे. आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्याशी दोनवेळा चर्चा झाली आहे. राजकारणात परिस्थिती बदलत असते. चर्चेतून मार्ग निघत असतात. काहीवेळा निर्णय घेता येत नाहीत तरीही एकमेकांमध्ये संवाद असणे आवश्यक आहे. नांदेड जिल्ह्यात महायुतीची ताकद मजबुत करण्यासाठी तसेच जिल्ह्याच्या विकासासाठी महायुतीच्या नेत्यांनी एकत्रित आले पाहिजे, असे स्पष्ट मत खा.अशोक चव्हाण यांनी व्यक्त केले.


यावेळी बोलतांना आ. प्रताप पाटील चिखलीकर म्हणाले की, नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे ८४ मतदार आहेत. नांदेड विधानपरिषद मतदारसंघ हा राष्ट्रवादी काँग्रेसला सोडला पाहिजे अशी भूमीका पान ४ वर

## विधानपरिषद निवडणुकीत महायुतीचाच डंका; पाच जागा बिनविरोध;मविआला धोबीपछाड

मुंबई/प्रतिनिधी-विधानपरिषदेतील १७ रिक्त जागांसाठी होत असलेल्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी अनेक उमेदवारांनी माघार घेतल्याने महायुतीच्या तब्बल पाच जागा बिनविरोध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तर महाविकास आघाडीला (मविआ) सलग धक्के बसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

राज्यातील विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या निवडणुकीत महायुतीने जोरदार आघाडी घेतल्याचे चित्र दिसत आहे. १८ जून रोजी मतदान तर २२ जून रोजी मतमोजणी होणार असली तरी अनेक मतदारसंघांतील समीकरणे अर्ज माघारीनंतर स्पष्ट झाली आहेत. अनेक ठिकाणी पक्षश्रेष्ठींनी बंडखोरांची समजूत काढण्यात यश मिळविले असून त्यामुळे निवडणूक लढतींचे स्वरूपही बदलले आहे. वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर, पुणे, ठाणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग आणि यवतमाळ या मतदारसंघांमध्ये विरोधी उमेदवारांनी माघार घेतल्याने महायुतीच्या उमेदवारांच्या बिनविरोध निवडीची शक्यता बळावली आहे. पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) समर्थित उमेदवाराने माघार घेतल्याने विक्रम काकडे यांचा मार्ग सुकर झाला आहे. तर कोकणात शिवसेना ठाकरे गटाचे बाळ माने यांनी माघार घेतल्याने अनिकेत तटकरे यांची निवड जवळपास निश्चित मानली जात आहे.याशिवाय नांदेड, जळगाव, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, भंडारा-गोंदिया, परभणी-हिंगोली आणि नागपूर या मतदारसंघांत महायुती व महाविकास आघाडीमध्ये थेट लढती रंगणार आहेत. नांदेडमध्ये काँग्रेसचे रामदास पाटील आणि भाजपचे अमर राजूरकर यांच्यातील सामना विशेष लक्षवेधी ठरणार आहे.सांगली-सातारा मतदारसंघात शिवसेनेचे तानाजीराव पाटील यांनी माघार घेतल्याने निवडणुकीची रंगत वाढली आहे. सोलापूरमध्ये भाजपचे राजेंद्र राऊत यांच्यासमोर नागेश अक्कलकोटे किंवा जीवन जानकर यांचे आव्हान कायम आहे. तर नाशिकमध्ये अपक्ष गोकुळ गीते आणि शिवसेनेचे नरेंद्र दराडे यांच्यात चुरशीची लढत होणार आहे.दरम्यान, उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेनंतर राज्यातील राजकीय चित्र महायुतीच्या बाजूने झुकल्याचे दिसत असून विधान परिषद निवडणुकीत महायुतीला मोठे यश मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अनेक मतदारसंघांत विरोधकांची माघार आणि बंडखोरांचे शांत होणे हा महायुतीसाठी मोठा दिलासा मानला जात आहे. त्यामुळे अंतिम निकालांपूर्वीच महायुतीने राजकीय आघाडी घेतल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

## ज्येष्ठ निर्माते पहलाज निहलानी यांचे निधन




मुंबई/प्रतिनिधी-हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ निर्माते आणि केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाचे (सेन्सॉर बोर्ड) माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांचे गुरुवारी वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून ते यकृताच्या आजाराने त्रस्त होते. उपचारासाठी त्यांना मुंबईतील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

पहलाज निहलानी यांनी हथकडी, गुनाहों का फैसला, पाप की दुनिया, मिट्टी और सोना, शोला और शबनम आणि आंखें यांसारख्या अनेक गाजलेल्या चित्रपटांची निर्मिती केली होती. सन २०१५ मध्ये त्यांनी सेन्सॉर बोर्डाच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली होती. पहलाज निहलानी यांच्या निधनाने हिंदी चित्रपटसृष्टीतील एका प्रभावी आणि स्पष्टवक्त्या व्यक्तिमत्त्वाचा अंत झाला आहे. त्यांच्या निधनाबद्दल चित्रपट क्षेत्रातील अनेक कलाकार, दिग्दर्शक आणि निर्मात्यांनी शोक व्यक्त करत श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## डॉ.व्यंकटेश काब्दे यांना 'पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ स्मृती पुरस्कार' जाहीर

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्थेतर्फे प्रदान करण्यात येणारा सन २०२५-२६ चा प्रतिष्ठेचा पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ स्मृती पुरस्कार ज्येष्ठ समाजसेवक व माजी खासदार डॉ.व्यंकटेश काब्दे यांना जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे वितरण नांदेड येथे आयोजित विशेष समारंभात करण्यात येणार आहे.





सामाजिक, शैक्षणिक आणि वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. पुरस्कारामध्ये रोख रक्कम, स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्राचा समावेश असतो. पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ यांच्या स्मरणार्थ २००४ पासून हा पुरस्कार दिला जात असून त्याला मराठवाड्यात विशेष प्रतिष्ठा प्राप्त आहे.

निवड समितीने डॉ. व्यंकटेश काब्दे यांच्या दीर्घकालीन सामाजिक योगदानाची दखल घेत त्यांची निवड केली. वैद्यकीय व्यवसाय सांभाळताना त्यांनी समाजकारणात सक्रिय सहभाग नोंदविला आहे. मराठवाडा जनता विकास परिषदेत विविध जबाबदाऱ्या सांभाळून त्यांनी विकासाच्या प्रश्नांवर सातत्याने काम केले आहे. स्व. गोविंदभाई श्रॉफ यांनी स्थापन केलेल्या मराठवाडा जनता विकास परिषदेचे केंद्रीय अध्यक्ष म्हणूनही डॉ.व्यंकटेश काब्दे यांनी प्रभावी नेतृत्व केले. त्यांच्या कार्यकाळात परिषदेच्या उपक्रमांना गती मिळाली. तसेच देगलूर परिसरात रुग्णसेवा व सामाजिक कार्यातून त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. डॉ.काब्दे पान ४ वर

## जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचा अवैध वाळू उत्खननावर छापा;३० लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड/प्रतिनिधी-जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी बुधवारी (दि. ४) पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास पिंपळगाव निमजी येथील गोदावरी नदीपात्रात सुरू असलेल्या अवैध वाळू उत्खननावर धडक कारवाई केली. या कारवाईत दोन बोटी, २० तराफे जाळून नष्ट करण्यात आले असून सुमारे १२५ ब्रास वाळू जप्त करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची अंदाजित किंमत ३० लाख रुपये असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

अचानक केलेल्या पाहणीत गोदावरी नदीपात्रात अवैध वाळू उपसा सुरू असल्याचे निदर्शनास आल्यानंतर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी तत्काळ तहसीलदार संजय वारकड यांना माहिती दिली. त्यानंतर तहसील कार्यालयाच्या पथकाने घटनास्थळी पोहोचून कारवाई सुरू केली. यावेळी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या पथकालाही घटनास्थळी पाचारण करण्यात आले. कारवाईदरम्यान नदीच्या दुसऱ्या बाजूने हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी लिंबगावचे सहाय्यक पोलीस

निरीक्षक बोधनकर यांनाही सतर्क करण्यात आले. संयुक्त पथकाने दोन बोटी व २० तराफे नष्ट करून मोठ्या प्रमाणात वाळू जप्त केली. दरम्यान, कारवाईनंतर परतत असताना शहर परिसरात अवैध वाळू वाहतूक करणारी दोन वाहनेही पकडण्यात आली. ही वाहने पुढील कारवाईसाठी वजीराबाद पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आली. तसेच घटनास्थळी आढळलेल्या चार मजुरांना पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. या मोहिमेत तहसीलदार संजय वारकड, पोलीस निरीक्षक नांदेड ग्रामीण ओमकांत चिंचोलकर, श्री केंद्रे, श्री मठवाड पोलीस उपनिरीक्षक, श्रीकृष्ण येलमटे, सय्यद मोहसीन मंडळ अधिकारी, सर्व तलाठी माधव भिसे , सरपे ,मारुती श्रीरामे, वानोळे, डॉ.जोशी मारुती कदम, राजेश बरोडा, कोतवाल बालाजी सोनटक्के इत्यादींनी सदरील कारवाई केली आहे. पोलीस व महसूल विभागाचे अधिकारी-कर्मचारी, मंडळ अधिकारी, तलाठी व कोतवाल यांनी सहभाग घेतला. अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीविरुद्ध प्रशासनाची कारवाई यापुढेही सुरू राहणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर पावले उचलली जातील, असा इशारा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिला.

# पश्चिम बंगालमध्ये महाराष्ट्राची पुनरावृत्ती?

**पश्चिम बंगालच्या राजकारणात घडत असलेल्या घडामोडींमुळे देशभरात नव्या राजकीय चर्चांना उधाण आले आहे. दीर्घकाळ सत्तेत राहिलेल्या तृणमूल काँग्रेसला पराभूत करून भारतीय जनता पक्षाने सत्ता हस्तगत केल्याची परिस्थिती आणि त्यानंतर विरोधी पक्षातील मोठ्या प्रमाणावरील फूट यामुळे अनेक राजकीय विश्लेषक महाराष्ट्रातील २०२२-२३ मधील घटनांची आठवण काढत आहेत. तथापि, कोणत्याही दोन राज्यांतील राजकीय परिस्थितीची तंतोतंत तुलना करता येत नसली, तरी सत्तासंघर्ष, पक्षांतर्गत मतभेद आणि नेतृत्वावरील प्रश्न या बाबतीत काही साम्यस्थळे निश्चितच दिसून येतात.पश्चिम बंगालचा राजकीय इतिहास पाहिला तर राज्याने अनेक दशकांपासून तीव्र राजकीय स्पर्धा अनुभवली आहे. १९७७ ते २०११ या कालावधीत डाव्या आघाडीने सलग सुमारे ३४ वर्षे सत्ता राखली. ही सत्ता संपुष्टात आणण्यासाठी ममता बॅनर्जी यांनी दीर्घकाळ संघर्ष केला. काँग्रेसमधून राजकीय कारकीर्द सुरू केलेल्या ममता बॅनर्जी यांनी नंतर तृणमूल काँग्रेसची स्थापना केली आणि रस्त्यावरच्या आंदोलनांपासून संसदीय राजकारणापर्यंत सर्व पातळ्यांवर डाव्या आघाडीला आव्हान दिले. अखेरीस २०११ मध्ये त्यांनी डाव्या आघाडीचा पराभव करून पश्चिम बंगालमध्ये सत्तांतर घडवून आणले. त्यानंतर सलग पंधरा वर्षे तृणमूल काँग्रेसने राज्य कारभार सांभाळला.अलीकडील विधानसभा निवडणुकीत मात्र मतदारांनी बदलाचा कौल दिल्याचे चित्र दिसून आले. भारतीय जनता पक्षाने स्पष्ट बहुमतापेक्षा अधिक जागा जिंकत सत्ता स्थापन केली. गेल्या काही निवडणुकांपासून भाजप पश्चिम बंगालमध्ये संघटन विस्तार आणि मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत होता. लोकसभा निवडणुकांमधील वाढलेली मतांची टक्केवारी, ग्रामीण भागातील वाढता प्रभाव आणि विरोधी मतांचे एकत्रीकरण याचा लाभ पक्षाला झाल्याचे मानले जाते.निवडणूक निकालानंतरची परिस्थिती मात्र अधिक महत्त्वाची ठरली. तृणमूल काँग्रेसमधील अनेक आमदारांनी पक्ष नेतृत्वाविषयी नाराजी व्यक्त करत स्वतंत्र गट स्थापन केल्याची घटना घडली. विरोधी पक्षनेतेपदाच्या दाव्यावरून निर्माण झालेला संघर्ष आणि त्यानंतरच्या घटनांनी राज्यातील राजकीय अस्थिरतेची चर्चा वाढवली. लोकशाही व्यवस्थेत पक्षांतर्गत मतभेद नवीन नाहीत; परंतु जेव्हा ते संघटनात्मक फुटीपर्यंत पोहोचतात, तेव्हा त्याचा परिणाम केवळ पक्षावरच नव्हे तर संपूर्ण राज्याच्या राजकारणावर होतो.याच ठिकाणी महाराष्ट्राचा संदर्भ पुढे येतो. २०२२ मध्ये शिवसेनेतील मोठ्या बंडामुळे राज्याच्या राजकारणात मोठे वळण आले. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली अनेक आमदारांनी स्वतंत्र भूमिका घेतली. त्यानंतर महाविकास आघाडी सरकार कोसळले आणि नवीन सत्तासमीकरण निर्माण झाले. पक्षाची मूळ ओळख, आमदारांचा पाठिंबा, विधिमंडळ गट आणि संघटनात्मक नियंत्रण यासंबंधीचे प्रश्न न्यायालयीन आणि घटनात्मक पातळीवर चर्चिले गेले. या प्रक्रियेमुळे भारतीय राजकारणात पक्षांतर, गटबाजी आणि घटनात्मक संस्थांच्या भूमिकेबाबत व्यापक चर्चा झाली.पश्चिम बंगालमध्ये उद्भवलेली परिस्थिती महाराष्ट्राच्या अनुभवाशी काही प्रमाणात साम्य दर्शवत असली, तरी दोन्ही राज्यांची राजकीय पार्श्वभूमी भिन्न आहे. महाराष्ट्रात प्रश्न सत्ताधारी पक्षातील फुटीचा होता, तर पश्चिम बंगालमध्ये तो निवडणुकीनंतर विरोधी पक्षाच्या पुनर्रचनेशी संबंधित असल्याचे दिसते. त्यामुळे घटनात्मक परिणाम, न्यायालयीन प्रश्न आणि राजकीय परिणाम यांचे स्वरूपही वेगळे असू शकते.लोकशाहीत सत्तांतर ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. मात्र कोणत्याही पक्षाचा उदय किंवा अस्त हा केवळ निवडणूक निकालांवर अवलंबून नसतो. संघटनात्मक एकजूट, नेतृत्वावरील विश्वास, कार्यकर्त्यांचा सहभाग आणि जनतेच्या अपेक्षांना दिलेला प्रतिसाद यावर राजकीय पक्षांचे भविष्य ठरत असते. पश्चिम बंगालमधील अलीकडील घडामोडी हेच अधोरेखित करतात. मतदारांनी बदल स्वीकारला असला तरी नव्या सत्ताधाऱ्यांसमोर जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे मोठे आव्हान आहे. त्याचवेळी तृणमूल काँग्रेसपुढे आत्मपरीक्षण करून नव्याने उभारी घेण्याचे आव्हान उभे आहे.पश्चिम बंगालमध्ये महाराष्ट्राची पुनरावृत्ती होते की नाही, याचे उत्तर आगामी काळच देईल. मात्र एक गोष्ट निश्चित आहे; भारतीय लोकशाहीतील राजकीय पक्षांसाठी जनाधार टिकवून ठेवणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच पक्षांतर्गत एकात्मता आणि सक्षम नेतृत्व जपणेही आवश्यक आहे. हाच या संपूर्ण घडामोडींचा सर्वात मोठा राजकीय धडा ठरतो.**

# सबसे बडा रुपय्या?

आजच्या युगात पैसा हा जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, प्रवास, उद्योग, व्यवसाय अशा प्रत्येक गोष्टीसाठी पैशाची गरज असते. पैसा नसल्यास माणसाचे जीवन अनेक अडचणींनी वेढले जाते, हे वास्तव कोणीही नाकारू शकत नाही. परंतु एक प्रश्न मात्र सतत मनाला अस्वस्थ करतो, पैसा खरोखरच सर्व काही आहे का? माणुसकी, प्रेम, आपुलकी, नाती, विश्वास, संस्कार आणि चारित्र्य यांच्यापेक्षा पैसा मोठा असू शकतो का?




आज समाजात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, प्रत्येक गोष्ट पैशाच्या तराजूत मोजली जात आहे. एखादा कार्यक्रम आयोजित करायचा असेल, मोर्चा काढायचा असेल, प्रसिद्धी मिळवायची असेल, निवडणूक लढवायची असेल किंवा कोणत्याही प्रकारचा प्रभाव निर्माण करायचा असेल, तर सर्वप्रथम पैशाची आवश्यकता भासते. अनेक ठिकाणी अशी मानसिकता तयार झाली आहे की पैसा फेका आणि तमाशा बघा. ज्याच्याकडे पैसा आहे त्याच्याकडे लोक आकर्षित होतात, त्याचेच ऐकले जाते आणि त्यालाच महत्त्व दिले जाते.पूर्वीच्या काळात माणसांच्या नात्यांना किंमत होती. गावात एखाद्याच्या घरी संकट आले तर सगळे गाव धावून जात असे. आज मात्र शेजारी शेजाऱ्याला ओळखत नाही. नातेवाईकांमध्येही व्यवहाराला अधिक महत्त्व आले आहे. प्रेम, आपुलकी आणि जिव्हाळा हळूहळू कमी होत चालला आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांची अवस्था पाहिली तर मन व्यथित होते. ज्यांनी आयुष्यभर कुटुंबासाठी कष्ट केले, त्यांनाच आज अनेकदा दुर्लक्षित केले जाते. पैसा कमावणाऱ्या व्यक्तीला सन्मान मिळतो, पण अनुभवाने समृद्ध असलेल्या वृद्धांना अनेकदा कवडीमोल किंमत दिली जाते. ही आपल्या समाजाची मोठी शोकांतिका आहे.

पूर्वी सोन्याचे, चांदीचे आणि तांब्याचे चलन होते. त्या काळात साधनसंपत्ती कमी होती, पण समाधान जास्त होते. माणूस प्रामाणिक होता, मेहनती होता आणि आपल्या कष्टांवर विश्वास ठेवत होता. आज मात्र कागदी नोटा आणि डिजिटल व्यवहारांचे युग आले आहे. सुविधा वाढल्या, पण माणुसकी कमी झाली. अनेकदा असे दिसून येते की चुकीच्या मार्गाने पैसा कमावणारे लोक ऐषआरामाचे जीवन जगतात, तर प्रामाणिकपणे कष्ट करणारा माणूस संघर्ष करत राहतो.आज समाजात अनेक शासकीय योजना राबवल्या जात आहेत. महिलांसाठी विविध योजना, मोफत गॅस, आर्थिक मदत आणि इतर सुविधा दिल्या जात आहेत. या योजनांचा लाभ अनेकांना होत असला तरी काही ठिकाणी त्याचे दुष्परिणामही दिसून येतात. ग्रामीण भागात शेतीकामासाठी मजूर मिळणे कठीण झाले आहे. शेतकऱ्यांना मजुरीचे वाढते दर परवडत नाहीत. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती आधीच संकटात आहे. अवकाळी पाऊस, दुष्काळ, गारपीट आणि बाजारातील अस्थिर दर यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे.

आपला शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे. तो स्वतःच्या सुखाचा विचार न करता राबतो आणि देशवासीयांच्या ताटात अन्न पोहोचवतो. पण त्याच्या वेदना समजून घेण्यासाठी समाजाकडे वेळ नाही. त्याच्या डोळ्यातील अश्रू, त्याचे कर्ज, त्याची चिंता आणि त्याचा संघर्ष अनेकांना दिसत नाही. समाज पैशाच्या मागे धावत असताना अन्न निर्माण करणाऱ्या शेतकऱ्याची उपेक्षा करीत आहे.आज यंत्रसामग्री आणि तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. यंत्रे आली, उत्पादन वाढले, वेग वाढला; पण त्याचबरोबर खर्चही वाढला. डिझेल, पेट्रोल, वीज आणि इतर संसाधनांचे दर वाढत आहेत. सामान्य माणूस महागाईच्या ओझ्याखाली दबला जात आहे. त्याचे उत्पन्न मर्यादित आहे, पण खर्च सतत वाढत आहेत.न्यायव्यवस्थेचाही विचार केला तर अनेकदा पैसा प्रभाव टाकताना दिसतो. कायद्यापुढे सर्व समान असले पाहिजेत, पण प्रत्यक्षात आर्थिकदृष्ट्या सक्षम व्यक्ती अनेकदा आपले मार्ग सोपे करून घेतात. गरीब व्यक्तीला न्याय मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो. हे वास्तव समाजातील विषमता अधोरेखित करते.



दत्तोपंत डहाळे
नांदेड.

आज प्रसिद्धी मिळवण्यासाठीही पैशाचा वापर केला जातो. पुरस्कार, सन्मान, जाहिराती आणि विविध मंचांवर झळकण्यासाठी पैसा खर्च केला जातो. खऱ्या अर्थाने कार्य करणाऱ्या अनेक व्यक्ती प्रकाशझोतात येत नाहीत, तर काही लोक केवळ प्रसिद्धीसाठी विविध मार्गांचा अवलंब करतात. त्यामुळे गुणवत्तेपेक्षा प्रसिद्धी आणि पैशाचे महत्त्व वाढल्याचे चित्र दिसते. समाजातील गुन्हेगारीही वाढत आहे. चोरी, फसवणूक, भ्रष्टाचार, बलात्कार, खून आणि इतर गुन्ह्यांच्या मागे अनेकदा पैशाचा हव्यास दिसून येतो. काही लोक पैसा मिळवण्यासाठी कोणत्याही थराला जाण्यास तयार असतात. नैतिक मूल्ये आणि सामाजिक जबाबदारी यांचा विचार मागे पडतो.कुटुंब व्यवस्थेवरही पैशाच्या हव्यासाचा परिणाम झाला आहे. संपत्तीच्या वादातून भाऊ भावाविरुद्ध उभा राहतो. काही ठिकाणी आई-वडिलांनाही त्रास दिला जातो. वारसा, मालमत्ता आणि आर्थिक स्वार्थ यामुळे नात्यांमध्ये कटुता निर्माण होते. ही परिस्थिती चिंताजनक आहे.

राजकारणातही पैशाचे वाढते महत्त्व सर्वश्रुत आहे. निवडणुका, प्रचार, पक्षांतर आणि विविध राजकीय हालचालींमध्ये पैशाचा प्रभाव दिसून येतो. जनतेच्या प्रश्नांपेक्षा अनेकदा सत्तेचे गणित महत्त्वाचे ठरते. रोज नवे मुद्दे निर्माण होतात आणि जुने प्रश्न विस्मरणात जातात. त्यामुळे लोकांच्या मूलभूत समस्यांकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही अनेकदा कुटुंबातील सदस्य एकमेकांविरुद्ध उभे राहतात. राजकीय महत्त्वाकांक्षा आणि पदाची इच्छा यामुळे नात्यांमध्ये दुरावा निर्माण होतो. समाजात द्वेषाचे वातावरण तयार होते. लोकहितापेक्षा व्यक्तिगत हिताला अधिक महत्त्व दिले जाते.आजची सर्वात मोठी गरज म्हणजे मी या अहंकारातून बाहेर पडणे. मी ऐवजी आपण हा शब्द स्वीकारला पाहिजे. एकमेकांना मदत करणारा, सहकार्य करणारा आणि समाजहिताचा विचार करणारा दृष्टिकोन विकसित केला पाहिजे. राष्ट्राच्या विकासासाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक आहेत.

देशभक्ती ही केवळ घोषणांमध्ये नसून आचरणात असली पाहिजे. राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज आणि संविधान यांचा आदर प्रत्येक नागरिकाने केला पाहिजे. देशासाठी योगदान देण्याची भावना जोपासली पाहिजे. समाजात जबाबदार नेतृत्व निर्माण होणे आवश्यक आहे.काही वर्षांपूर्वी झालेल्या नोटाबंदीच्या काळातही आपण पाहिले की पैसा हा अंतिम सत्य नाही. अनेकांनी जमा केलेला काळा पैसा निष्प्रभ झाला. यावरून हे स्पष्ट होते की पैसा तात्पुरता असतो, पण माणसाचे चारित्र्य आणि समाजातील प्रतिष्ठा कायम टिकते.जीवनात पैसा आवश्यक आहे, परंतु तो सर्वकाही नाही. पैशाने मोठे घर विकत घेता येते; पण घरातील प्रेम विकत घेता येत नाही. पैशाने महागडे घड्याळ विकत घेता येते; पण गेलेला वेळ परत मिळवता येत नाही. पैशाने औषधे विकत घेता येतात; पण निरोगी आयुष्य विकत घेता येत नाही. पैशाने पलंग विकत घेता येतो; पण शांत झोप विकत घेता येत नाही. पैशाने माणसे जवळ आणता येतात; पण खरी माणुसकी निर्माण करता येत नाही.

नाती ही जीवनाची खरी संपत्ती आहेत. आई-वडिलांचे प्रेम, मित्रांची साथ, कुटुंबाचा आधार, समाजातील स्नेह आणि परस्पर विश्वास हेच खरे धन आहे. पैसा संपला तर पुन्हा कमावता येतो; पण तुटलेली नाती पुन्हा जोडणे कठीण असते.आजच्या पिढीने याचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. प्रसिद्धी, पुरस्कार आणि संपत्ती यामागे धावताना माणुसकी हरवू देऊ नये. नम्रता, प्रेम, आपुलकी आणि सहकार्य यांना जीवनात स्थान दिले पाहिजे. मतभेद असू शकतात, वाद होऊ शकतात; पण ते मनात कायमचे ठेवू नयेत. क्षमा करण्याची आणि पुढे जाण्याची वृत्ती जोपासली पाहिजे.समाजातील प्रत्येक व्यक्तीने माणसे जोडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी व्हावे. संकटात मदतीचा हात पुढे करावा. वयोवृद्धांचा सन्मान करावा. शेतकऱ्यांच्या कष्टांची जाणीव ठेवावी. समाजातील दुर्बल घटकांना आधार द्यावा.आपण सर्वजण या देशाचे नागरिक आहोत. देशाचा विकास केवळ सरकार किंवा नेत्यांमुळे होत नाही; तर प्रत्येक नागरिकाच्या योगदानामुळे होतो. म्हणूनच समाजहित, राष्ट्रहित आणि मानवतेचा विचार आपल्या कृतीतून दिसला पाहिजे.

शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, सबसे बड़ा रुपय्या हा विचार जरी वास्तवातील काही पैलू दाखवत असला तरी अंतिम सत्य नाही. सर्वात मोठा पैसा नसतो; सर्वात मोठी असते माणुसकी. सर्वात मोठी असते आपुलकी. सर्वात मोठी असतात नाती. सर्वात मोठा असतो विश्वास. सर्वात मोठा असतो आशीर्वाद.पैशामागे धावू नका असे नाही, पण पैशासाठी माणुसकी गमावू नका. पैसा कमवा, प्रगती करा, यशस्वी व्हा; पण त्याचबरोबर प्रेम, जिव्हाळा, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी जपा. कारण आयुष्याच्या शेवटी बँकेतील शिल्लक नव्हे, तर आपण जोडलेली माणसे आणि मिळवलेले आशीर्वादच आपल्या खऱ्या संपत्तीचे मोजमाप करतात.माणसे जोडा, नाती जोडा, प्रेम वाढवा आणि समाजात माणुसकीची ज्योत तेवत ठेवा. हेच खरे वैभव आहे, हेच खरे धन आहे आणि हेच जीवनाचे खरे सार आहे.

# बेंद्री-गोळेगाव दरम्यान रखडलेल्या रस्त्यामुळे नागरिक त्रस्त; अपघातांचे प्रमाण वाढले!

नांदेड/प्रतिनिधी-नायगाव ते बेंद्री या मुख्य रस्त्यावरील बेंद्री ते गोळेगावला जोडणारा अंदाजे एक किलोमीटरचा रस्ता मागील वर्षभरापासून रखडलेला आहे. रस्त्याच्या कामासाठी टाकण्यात आलेली बारीक गिट्टी अद्याप तशीच असल्याने त्या गिट्टीवरुन विशेषतः दुचाकीस्वारांचा तोल जाऊन अपघात होण्याचे प्रकार वारंवार घडत असून अनेक जण जखमी झाले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. भविष्यात एखादी मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, रस्त्याचे काम अपूर्ण अवस्थेत सोडल्याने प्रवास धोकादायक बनला आहे. बारीक गिट्टीमुळे वाहनांचे नियंत्रण सुटत असल्याने अपघातांची संख्या वाढली आहे. शालेय विद्यार्थी, शेतकरी तसेच दैनंदिन प्रवास करणाऱ्या नागरिकांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस तोंडावर असल्याने या भागातील मांजरम, मांजरमवाडी, मोकासदरा, धानोरा येथील शेतकऱ्यांना खरीपाच्या पेरणीकरीता लागणारे बी- बियाणे व खत खरेदीसाठी नायगाव बाजारपेठेत यावे लागते. परंतु रस्त्याची अवस्था दयनिय झाल्याने याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत असून या एक कि.मी. च्या रस्त्याला कँटाळून नागरिक गडगा मार्गे नर्सी हून नायगावला



जात आहेत. त्यामुळे शेतकरी व नागरिकांना आर्थिक झळीसोबतच वेळही वाया घालवावा लागत आहे. काही दिवसांत शाळा, महाविद्यालय सुरु होणार असल्याने या भागातील विद्यार्थ्यांना शाळा, महाविद्यालयाला जाताना मोठी कसरत करावी लागणार हे मात्र निश्चित. रस्त्याच्या बिकट अवस्थेकडे या भागाच्या लोकप्रतिनिधींसह संबंधित विभागाने वेळीच लक्ष देऊन हा मार्ग लवकरात लवकर दुरुस्त करुन शालेय विद्यार्थ्यांसह या भागातील शेतकरी व नागरिकांची होणारी अडचण दूर करावी अशी मागणी जोर धरत आहे. या मार्गावरुन सध्या अवजड वाहनांसह दुचाकी, तीन चाकी वाहनांची वर्दळ वाढल्याने रस्त्याची अवस्था आणखी बिकट झाली आहे. रस्त्यावर अस्ताव्यस्त पसरलेल्या गिट्टीमुळे वाहन चालविणे जिकिरीचे ठरत असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. संबंधित विभागाने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन रखडलेले काम पूर्ण करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. दरम्यान, प्रशासनाने त्वरित दखल घेऊन रस्ता दुरुस्तीचे काम सुरू न केल्यास या भागातील नागरिकांच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनीही या प्रश्नात लक्ष घालून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# नांदेड येथे 'शब्द शब्द तुझाच आहे...' या कवितासंग्रहाचा ७ जूनला प्रकाशन सोहळा

नांदेड/प्रतिनिधी-येथील वस्तू व सेवा कर विभागाचे राज्यकर उपायुक्त निलेश शेवाळकर लिखित शब्द शब्द तुझाच आहे या कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा रविवार, दि. ७ जून रोजी स.१० वा. स्व. पूर्णामलजी लाहोटी सभागृह, सायन्स कॉलेज, नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे. या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ मराठी कवी, साहित्यिक व व्याख्याते इंद्रजीत भालेराव हे राहणार आहेत.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून पुणे येथील रहिवाशी सेवानिवृत्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुनील वेदपाठक, छत्रपती संभाजीनगर येथील वस्तू व कर विभागाचे अपर राज्यकर आयुक्त अभिजित राऊत, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, तसेच पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांची उपस्थिती लाभणार आहे. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून स्वारातीम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख रामकृष्ण सोलंके, तसेच ग्रंथाली प्रकाशनचे विश्वस्त सुदेश हिंगलापूरकर उपस्थित राहणार आहेत. प्रेम, विरह, आईची माया, नात्यांची कोमलता आणि आयुष्यातील भावविश्व अत्यंत साध्या पण हृदयस्पर्शी शब्दांत मांडण्याचा प्रयत्न या कवितासंग्रहातून करण्यात आला आहे. तरुणाईच्या भावना आणि सामान्य माणसाच्या मनातील न बोललेले भाव या कवितांमधून प्रभावीपणे व्यक्त होत असल्याने साहित्यप्रेमींमध्ये या संग्रहाबद्दल विशेष उत्सुकता निर्माण झाली आहे. ग्रंथाली प्रकाशन, मुंबई निर्मित या कवितासंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यास सर्व साहित्यप्रेमी व रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रंथाली प्रकाशन व निलेश वसंतराव शेवाळकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांनी हयात प्रमाणपत्र सादर करावे

नांदेड/प्रतिनिधी-केंद्र व राज्य पुरस्कृत विशेष सहाय्य योजनांतील लाभार्थ्यांना हयात प्रमाणपत्र सादर करण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी बेनिफिशरी सत्यापन प प्रणाली सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून लाभार्थ्यांना घरबसल्या हयात प्रमाणपत्र सादर करता येणार असून वेळेची बचत होण्यासोबतच कार्यालयीन हेलपाट्यांपासूनही दिलासा मिळणार आहे. विशेष सहाय्य योजनेतील पात्र लाभार्थ्यांनी आपले हयात प्रमाणपत्र ऑनलाइन पद्धतीने सादर करावे, जेणेकरून त्यांचे अनुदान बंद होणार नाही, असे आवाहन तहसिलदार, संगायो (शहर) डि. एन गायकवाड यांनी केले आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# लिंबगावमध्ये जिल्हाधिकाऱ्यांचा मुक्काम;ग्रामस्थांशी साधला थेट संवाद

नांदेड/प्रतिनिधी-एक दिवस मुक्काम खेड्यामध्ये या उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी काल रात्री ३ जून रोजी नांदेड तालुक्यातील लिंबगाव येथे भेट देऊन मुक्काम केला.यावेळी त्यांनी गावातील विविध कामांची पाहणी करत ग्रामस्थांशी थेट संवाद साधला.

जिल्हाधिकारी श्री. कर्डिले यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, स्मशानभूमी परिसरातील वृक्षारोपण, घरकुल लाभार्थी, संजय गांधी व इंदिरा गांधी निराधार योजनेचे लाभार्थी तसेच अंत्योदय योजनेतील कुटुंबांना प्रत्यक्ष भेट दिली. गावातील विविध समस्या आणि नागरिकांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी बैठक घेण्यात आली. यामध्ये स्थानिक प्रश्नांवर चर्चा करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल, सहाय्यक पोलीस निरीक्षक बोधनकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मुंडे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता श्री.देशमुख, नायब तहसीलदार स्वप्निल दिगलवार व सुनील माचेवाड,



पोलीस उपनिरीक्षक सय्यद, मंडळ अधिकारी अनिरुद्ध जोंधळे, तलाठी अंजुषा जाधव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांशी संवाद साधताना जिल्हाधिकारी श्री. कर्डिले यांनी विविध कल्याणकारी योजनांची माहिती दिली. तसेच शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान, नवीन संशोधन, पीककर्ज आणि पीकविमा योजनांबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. जिल्हाधिकाऱ्यांच्या या दौऱ्यामुळे ग्रामस्थांना आपले प्रश्न थेट मांडण्याची संधी मिळाली. त्यांच्या भेटीबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत आभार मानले.

## महिलेवर हल्ला करणाऱ्या आरोपीस अटक

नांदेड/प्रतिनिधी-एका महिलेवर चाकुने हल्ला करुन गंभीर जखमी करणाऱ्या साहेबराव गायकवाड यास स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी तामसा रोडवर अटक केली आहे. साहेबराव उर्फ बादल श्यामराव गायकवाड (वय ३६) धंदा ऑटो चालक रा. आंबेडकरनगर,नांदेड हा अनेक दिवसांपासून समाज माध्यमावरील महिलांचे मोबाईल नंबर काढत असत. त्यानंतर महिलांना कॉल करुन अश्लिल भाषेत शिवीगाळ करायचा. काही दिवसापूर्वी त्याने एका महिलेवर चाकुने हल्ला करुन जखमी केले होते.

## प्रामाणिकपणाचा आदर्श; महिला भाविकेची हरवलेली पर्स परत

माहूर/प्रतिनिधी-नागपूर येथील महिला भाविक श्रीमती माधुरी पळसेकर या आपल्या मुलीसह माहूर गडावरील रेणुका मातेच्या दर्शनासाठी आल्या होत्या. दर्शनानंतर त्या संत गुलाब बाबा हॉटेलमध्ये चहासाठी थांबल्या. मात्र, निघताना त्यांची मंगळसूत्र, महत्त्वाची कागदपत्रे व इतर साहित्य असलेली पर्स तेथेच विसरली गेली.

दरम्यान, हॉटेलचे संचालक संजय घोगरे व कर्मचाऱ्यांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी पर्स सुरक्षित ताब्यात घेतली आणि मंदिर व्यवस्थापनालाही याची माहिती दिली. दर्शन आटोपून शहरातील लॉजवर पोहोचल्यानंतर श्रीमती पळसेकर यांना पर्स हरवल्याचे लक्षात आले. त्यामुळे त्या घाबरून पुन्हा गडावर परतल्या व चौकशी सुरू केली. यावेळी संजय घोगरे, नगरसेवक प्रतिनिधी राजू सौंदलकर व इतर सह व्यावसायिकांनी त्यांना हॉटेलमध्ये नेऊन पर्समधील सर्व साहित्याची खातरजमा करून ती सुखरूप परत केली. त्यामुळे श्रीमती पळसेकर यांनी संजय घोगरे, हॉटेल कर्मचारी आणि माहूरकरांचे मनःपूर्वक आभार मानले.संजय घोगरे यांनी दाखविलेल्या प्रामाणिकपणाचे मंदिर व्यवस्थापन समिती, व्यावसायिक, भाविक व नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे.




आज दुपारच्या सुमारास अचानक आलेल्या जोरदार पावसाने नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाल्याचे चित्र पहावयास मिळाले. या पावसाचे पाणी शहरातील रस्त्यावरील डबक्यात जागोजागी साचल्यामुळे पादचाऱ्यांना रस्त्यावरुन जातांना मोठी कसरत करावी लागली.

# ५० हजाराची लाच घेताना मुख्याध्यापकास अटक

नांदेड/प्रतिनिधी-लिपिकाकडून ५० हजाराची लाच घेतांना हुतात्मा माधव महाविद्यालय ता.मुखेड येथील मुख्याध्यापक राजेश पडलवार यांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीसांनी बुधवारी रंगेहाथ पकडले आहे.

मुखेड येथील हुतात्मा माधव महाविद्यालयात लिपिक पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यास मुख्याध्यापक राजेश पडलवार यांनी विद्यालयाच्या शालेय खर्चाच्या नावाने जानेवारी ते मे असे १२ हजार रुपयाची पाच महिन्यांचे हप्ते तसेच कर्मचाऱ्याच्या बदली करीता व नोटीस न देण्यासाठी ६० हजार रुपयांची मागणी केली होती. संबंधीत कर्मचाऱ्याने या संदर्भात लाच लुचपत प्रतिबंधक कार्यालयाकडे रितसर तक्रार दाखल केली. बुधवार दि.३ जून रोजी शासकीय पंचासमक्ष लाचेची पडताळणी करण्यासाठी तक्रारदार कर्मचाऱ्याने मुख्याध्यापक राजेश पडलवार यांना मोबाईलवर कॉल केला असता त्यांनी शारदानगर नांदेड येथील घरी बोलावून घेतले. शासकीय पंचासमक्ष मुख्याध्यापक राजेश पडलवार यांनी तक्रारदार कर्मचाऱ्याकडे शालेय खर्चाचा हप्ता, बदलीकरीता व नोटीस न देण्यासाठी ६० हजार रुपयांची लाचेची मागणी केली. तडजोडीअंती मुख्याध्यापक पडलवार यांनी ५० हजार रुपये स्विकारण्याचे मान्य केले. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक प्रशांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक श्रीमती माधुरी यावलीकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस कर्मचाऱ्यांनी शारदानगर येथे पडलवार यांच्या घरासमोर सापळा रचला. तक्रारदार कर्मचाऱ्याकडून पडलवार यांनी त्यांच्या घरी ५० हजार रुपयांची लाच घेतांना पोलीसांनी रंगेहाथ पकडले. पोलीसांनी पडलवार यांच्या घराची घरझडती घेतली असून त्यांचा मोबाईल जप्त केला आहे. या प्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात मुख्याध्यापक राजेश पडलवार यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दिपनगर इरिगेशन कॉलनीतील प्रकाश भांडे बेपत्ता

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील दिपनगर परिसरातील इरिगेशन कॉलनीत राहणारे प्रकाश भाऊराव भांडे हे दि. ११ मे पासून बेपत्ता झाले असून याप्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.



दि.११ मे रोजी प्रकाश भाऊराव भांडे हे आपली सायकल घेऊन नेहमीप्रमाणे मालेगाव रोडवरील कावेरी हॉटेलमध्ये रात्रपाळी कामावर गेले होते. परंतु दि. १२ मे रोजी रात्री पर्यंत देखील ते घरी परतलेच नाही. त्यानंतर दोन- तीन दिवस नातेवाईकांकडे शोध घेतल्यानंतरही ते सापडले नाही. याप्रकरणी त्यांची पत्नी अनिता भांडे यांनी दिलेल्या माहितीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. प्रकाश भांडे यांचे वय ६३ वर्ष असून रंग गव्हाळ तर सडपातळ बांधा आहे. कुणास आढळून आल्यास भाग्यनगर पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# कंधारमध्ये अज्ञात चोरट्यांनी केली चिंतामणी हॉटेलची मोडतोड

## उपविभागीय पोलीस अधिकारी आश्विनी जगताप यांनी केली पाहणी

कंधार/प्रतिनिधी-काल रात्री दि.३ जून रोजी कंधार शहरात अज्ञात चोरट्यांनी तहसील कार्यालय परिसरातील हॉटेल चिंतामणी येथे तोडफोड करून चोरीचा प्रयत्न केला, या घटनेने परिसरात खळबळ उडवली आहे. घटनेची माहिती मिळताच कंधारचे नगराध्यक्ष शहाजी राजे नळगे यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. त्यांच्या सोबत उपविभागीय पोलीस अधिकारी आश्विनी जगताप तसेच पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांनीही घटनास्थळी उपस्थित राहून संपूर्ण प्रकाराची सविस्तर माहिती घेतली.

यावेळी नगराध्यक्ष शहाजी राजे नळगे यांनी प्रशासनाला स्पष्ट सूचना देताना सांगितले की, घडलेला प्रकार अत्यंत निंदनीय असून याची सखोल चौकशी करून आरोपींचा लवकरात लवकर शोध घेऊन कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच शहरातील व्यापाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांनी गस्त वाढवावी, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.या प्रसंगी नगरसेवक असेफ शेठ, मंडळ अध्यक्ष अॅड. गंगाप्रसाद यन्नावार, कुमार अण्णा कांबळे, सतीश देवकते, सुरेश राठोड, पोलीस पाटील व्यंकटराव पा. जाधव, नागेश पवार, गजू बडवणे, स्थानिक व्यापारी वर्ग, विविध पक्षीय पदाधिकारी तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी या घटनेबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत लवकरात लवकर आरोपींना अटक करून न्याय मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त



केली. संपूर्ण घटनेचा पुढील तपास पोलीस प्रशासनाकडून सुरू असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व इतर तांत्रिक बाबींची तपासणी केली जात आहे.

## महावितरणच्या कर्मचाऱ्यास मारहाण

नांदेड/प्रतिनिधी-डीपी दुरुस्त करीत असतांना महावितरणच्या कर्मचाऱ्यास मारहाण केल्याची घटना मौजे गोळेगाव ता.उमरी येथे घडली आहे. महावितरणचे कर्मचारी व्यंकट शिवाजी उपवास हे बुधवार दि.३ जून रोजी दुपारी मौजे गोळेगाव येथे नादुरुस्त डीपी दुरुस्त करीत असतांना बालाजी बोबडे हा त्या ठिकाणी आला. डीपी बंद का केली म्हणून व्यंकट उपवास यांना शिवीगाळ करीत मारहाण केली. याप्रकरणी उमरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय हदगांव**

जा.क्र.२०२६/संकीर्ण/जन्म-मृत्यू नोंद/सिआर- दिनांक: ४/०५/२०२६

**!! जाहीर प्रगटन !!**

तालुका कार्यकारी दंडाधिकारी, हदगाव यांचे न्यायालयात
जन्म-मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा-२०२३ मध्ये कलम ११ (२) व (३) अन्वये अर्ज क्रं.
श्री. रामराव विठ्ठलराव वाठोरे
विरुद्ध
जन्म-मृत्यू नोंदणी निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी हरडफ

विषयः- जन्म-मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा २०२३ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये यांची जन्माची नोंद घेण्याकरीता आदेशीत करणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार रामराव विठ्ठलराव वाठोरे रा.हरडफ ता. हदगाव जि.नांदेड वय ६० वर्ष यांनी त्यांची आई नामे हरणाबाई विठ्ठल वाठोरे हिचा दि. १५.०१.१९९९ रोजी हरडफ ता. हदगाव येथे मृत्यु झाला असून सदर जन्म-मृत्यू नोंद नोंदणी सुधारणा कायदा २०२३ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये घेण्याकरीता जन्म-मृत्यू नोंदणी निबधंक तथा ग्राम विकास अधिकारी हरडफ ता. हदगाव जि. नांदेड यांना आदेशीत करण्यासाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी यांची मृत्युची नोंद जन्म-मृत्यू नोंदणी निबंधक तथा ग्राम विकास अधिकारी हरड़फ ता.हदगाव जि.नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार यांच्या आई हरणाबाई विठ्ठल वाठोरे दि.१५.०१.१९९९ रोजीची मृत्युची नोंद घेण्याविषयी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासून १५ दिवसामध्ये या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत हजर राहून आक्षेप किंवा उजरी न केल्यास सदरच्या अर्जावर गुणवत्तेनुसार आदेश पारीत करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
तालुका कार्यकारी दंडाधिकारी, हदगाव

## हदगावमध्ये तीन लाखाची घरफोडी

नांदेड/प्रतिनिधी-हदगाव शहरातील आझाद चौक येथे एका घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी कपाटातील तीन लाख रुपयांची रक्कम चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

शेख शमीन शेख अमीनसाब कुरेशी (वय ५१) रा.आझाद चौक,हदगाव हे घराला कुलूप लावून बाहेरगावी गेले असतांना दि.१ ते दि.२ जून च्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी शेख शमीन यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश केला. घरातील कपाट फोडून त्यामधील तीन लाख रुपयांची रक्कम चोरट्यांनी चोरुन नेली आहे. शेख शमीन यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन हदगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CHANGE IN NAME/SURNAME

My (old name) is **SHIRSATH BINA POPATRAO** which now I am, changing as (new name) **DEEPALI LILADHAR KAPSE**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**DEEPALI LILADHAR KAPSE**
R/o h.no.9, Ami raw house b/h income tax quters om colony, uttamnagar Ambad
Dist.Nashik-422010
M.No.-9371193777

CHANGE IN NAME

My (old name) is **DIPALI LIADHARRAO KAPSE** which now I am, changing as (new name) **DEEPALI LILADHAR KAPSE**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**DEEPALI LILADHAR KAPSE**
R/o h.no.9, Ami raw house b/h income tax quters om colony, uttamnagar Ambad
Dist.Nashik-422010
M.No.-9028821281

# हदगावचे उपअभियंता दिलीप बोबडे अखेर कार्यमुक्त

हदगाव/प्रतिनिधी सार्वजनिक बांधकाम उपविभाग, हदगाव येथे मागील साडेतीन वर्षांपासून कार्यरत असलेले सहाय्यक अभियंता श्रेणी-१ दिलीप हनुमंतराव बोबडे यांना अखेर त्यांच्या बदलीच्या ठिकाणी कार्यमुक्त करण्यात आले आहे. मुख्य अभियंता कार्यालय, नांदेड येथून याबाबतचे आदेश जारी करण्यात आले असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

दिलीप बोबडे यांनी हदगाव येथे रुजू होण्यापूर्वी किनवट येथील आदिवासी विकास उपविभागात सुमारे तीन वर्षे सेवा बजावली होती. त्यानंतर त्यांनी हदगाव येथे बदली करून घेतली होती. त्यांच्या कार्यकाळात विविध विकासकामां बाबत अनियमिततेच्या तक्रारी वेळोवेळी समोर आल्या होत्या. तसेच विभागातील काही कनिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी समन्वयाचा अभाव असल्याच्या चर्चा व अंतर्गत वादही चर्चेचा विषय ठरले होते अशी माहीती आहे. दरम्यान, हदगाव विधानसभा क्षेत्राचे आ. बाबुराव कदम यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात ब्रह्मवाडी (ता. हदगाव) येथील विकासकामांच्या अंदाजपत्रकात कथित त्रुटी असल्याचा मुद्दा उपस्थित केला होता अशी पण माहीती आहे याशिवाय पुनर्वसन योजनांतील काही कामांबाबतही विविध गावांमधून तक्रारी दाखल झाल्या होत्या. भानेगाव येथील पुनर्वसन प्रकल्पातील कामांबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. मागील महिन्याच्या अखेरीस राज्य शासनाने बोबडे यांची जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, हदगाव येथील रिक्त पदावर बदली केली होती. मात्र या बदलीला स्थगिती मिळविण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न झाल्याची चर्चा होती. तथापि, हे प्रयत्न निष्फळ ठरले असून अखेर बदली आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. मुख्य अभियंता रूपा राऊळ-गिरासे यांनी बोबडे यांना कार्यमुक्त केल्याचा अहवाल शासनाकडे सादर केला आहे. त्यामुळे हदगाव सार्वजनिक बांधकाम विभागातील त्यांच्या कार्यकाळाची अधिकृत सांगता झाली असून आता ते नव्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होणार आहेत. दरम्यान, त्यांच्या कार्यकाळातील विविध प्रकरणांबाबत भविष्यात कोणती प्रशासकीय किँवा चौकशीची कारवाई होते याकडे संबंधित विभागासह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# संकष्टी चतुर्थीनिमित्त श्री सत्यगणपती मंदिरात भाविकांची गर्दी

अर्धापूर/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर तालुक्यातील दाभड येथील प्रसिद्ध श्री सत्यगणपती मंदिरात संकष्टी चतुर्थीनिमित्त भाविकांची अलोट गर्दी उसळली होती. अधिक मासाचा योग आणि चतुर्थीच्या पवित्र पर्वावर गणरायाचे दर्शन घेण्यासाठी हिंगोली, परभणी आणि नांदेड जिल्ह्यातून हजारो भाविकांनी दाभड येथे हजेरी लावली.

मंदिराची मनमोहक सजावट संकष्टी चतुर्थीनिमित्त मंदिराच्या गाभाऱ्यात अत्यंत देखणी आणि मनमोहक फुलांची आरास करण्यात आली होती. विविध प्रकारच्या सुगंधी आणि रंगीबेरंगी फुलांनी सजलेल्या मंदिरामुळे संपूर्ण परिसर भक्तीमय आणि प्रसन्न वातावरणाने न्हाऊन निघाला होता. ही आकर्षक सजावट भाविकांचे विशेष आकर्षण ठरली. मराठवाड्यासह अनेक जिल्ह्यातील भक्तांचे श्रद्धास्थान म्हणून सत्य गणपती देवस्थानला ओळखले जाते. मराठवाडा, राज्य व परराज्यातील गणेशभक्त संकष्टी चतुर्थी, गणेश जयंती व दररोज दर्शनासाठी गर्दी करत असतात. यावर्षी अधिक मास सुरु असल्याने भाविकांमध्ये अधिकच उत्साह पाहायला मिळाला. भाविकांनी विशेष करुन धोंड्याचा नैवैद्य श्री गणरायाच्या चरणी अर्पण केला. गणरायाचे आशीर्वाद घेण्यासाठी मंदिराच्या परिसरात भाविकांनी पहाटेपासूनच रांगा लावल्या होत्या.

# श्री रेणुका देवी संस्थानच्या अध्यक्षपदाचा सह धर्मादाय आयुक्त हिरा शेळके यांनी पदभार स्वीकारला



माहूर/प्रतिनिधी-माहूर गडावरील साडेतीन शक्तीपीठांपैकी पूर्ण शक्तीपीठ असलेल्या श्री रेणुका देवी मंदिरच्या अध्यक्षपदी नांदेडचे सह धर्मादाय आयुक्त हिरा शेळके यांनी गुरुवारी दि. ४ रोजी पदभार स्वीकारला. या वेळी संस्थानचे विश्वस्त चंद्रकांत भोपी, संजय कान्नव, विनायक फंडाळे, अरविंद देव, सह व्यवस्थापक योगेश साबळे यांनी त्यांचे स्वागत करून सत्कार केला.

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये सप्टेंबर २०२५ पासून करण्यात आलेल्या सुधारणांनुसार नव्याने लागू करण्यात आलेल्या कलम ५०-ब अन्वये राज्यातील न्यायालयीन नियंत्रणाखाली असलेल्या देवस्थानांच्या व्यवस्थापनात महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. या अनुषंगाने २९ मे २०२६ रोजी राजपत्र प्रसिद्ध करण्यात आले असून संबंधित देवस्थानांच्या विश्वस्त मंडळातील अधिकार आता धर्मादाय विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले आहेत.शासनाच्या विधी व न्याय विभागामार्फत उपविधी सल्लागार तथा उपसचिव डॉ. कुंवरसिंह सिंघेल यांनी राज्यपालांच्या आदेशानुसार याबाबतचे राजपत्र प्रकाशित केले आहे. त्यानुसार माहूरच्या श्री रेणुका देवी संस्थानच्या व्यवस्थापनासाठी नांदेड येथील सह धर्मादाय आयुक्त हिरा शेळके यांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.श्री रेणुका माता देवस्थान हे प्राचीन धार्मिक स्थळ असून धर्मादाय कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी त्याच्या नियमनासाठी तत्कालीन न्यायालयांनी मंजूर केलेल्या योजनेनुसार दिवाणी अथवा जिल्हा न्यायाधीशांची पदसिद्ध नियुक्ती केली जात होती. मात्र विधिमंडळाने मंजूर केलेल्या दुरुस्ती विधेयकानंतर आणि स्वतंत्र अध्यादेश जारी झाल्यामुळे १ मे २०२६ पासून दिवाणी व जिल्हा न्यायाधीशांचे हे अधिकार संपुष्टात आले आहेत. नवीन तरतुदीनुसार संबंधित देवस्थानांच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष व प्रशासकीय अधिकार धर्मादाय विभागातील सहाय्यक आयुक्त, उपायुक्त किंवा सह आयुक्त यांच्याकडे सोपविण्यात आले आहेत. त्यानुसार श्री रेणुका देवी संस्थानच्या अध्यक्षपदी सह धर्मादाय आयुक्त हिरा शेळके यांनी अधिकृतपणे गुरुवारी कार्यभार स्वीकारला आहे.

# शिवसेनेतून बाळ मानेंची हकालपट्टी

मुंबई/प्रतिनिधी-विधान परिषद निवडणुकीत रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील शिवसेना (ठाकरे गट) चे उमेदवार बाळ माने यांनी अचानक आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने महायुती पुरस्कृत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार अनिकेत तटकरे यांचा बिनविरोध विजय निश्चित झाला. या निर्णयानंतर ठाकरे गटाने बाळ मानेंवर कठोर भूमिका घेत त्यांची पक्षातून हकालपट्टी केली.

रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत शेवटच्या क्षणी मोठी राजकीय घडामोड घडली. अर्ज माघारीच्या प्रक्रियेदरम्यान पालकमंत्री नितेश राणे हे बाळ मानेंसोबत उपस्थित असल्याने या घडामोडीला विशेष महत्त्व प्राप्त झाले. त्यामुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.उमेदवारी मागे घेण्यामागील कारण स्पष्ट करताना बाळ माने यांनी महाविकास आघाडीतील घटक पक्षांकडून आवश्यक पाठबळ न मिळाल्याचा आरोप केला. उमेदवारी अर्जासाठी लागणाऱ्या सूचकांच्या सह्या मिळविण्यासाठी अनेक प्रयत्न केले, मात्र अपेक्षित सहकार्य मिळाले नसल्याने निवडणूक लढविणे शक्य झाले नाही, असे त्यांनी सांगितले.

## रेती वाहतूक करणारा हायवा पकडला

नांदेड/प्रतिनिधी-मौजे अर्धापूर रोडवर अवैधरित्या रेती वाहतूक करणारा हायवा मंगळवारी रात्री पकडला आहे.

बेकायदेशिररित्या रेती हायवा टिप्परमध्ये टाकुन जादा दराने विक्रीसाठी घेवून जात असतांना मंगळवारी रात्री १२ च्या सुमारास हायवा क्र. एमएच ४६ बीयु-६३९० गस्तीवरील पोलीसांच्या पथकाने पकडला आहे. हायवा मध्ये पाच ब्रास रेती पोलीसांना आढळून आली. या प्रकरणी राजेश चौवरे याच्या विरुध्द अर्धापूर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पो.नि.कराड यांची कणखर भूमिका;अंबाडी गाव दारुमुक्तीच्या वाटेवर

## आता गावभर सीसीटीव्हीचे सुरक्षा कवच

किनवट/प्रतिनिधी-अंबाडीगाव दारुमुक्त करण्याचा गावकऱ्यांचा संकल्प आणि त्याला जोड म्हणून पोलीस निरीक्षक गणेश कराड यांची कणखर भूमिका त्यामुळे भावीपिढी व्यसनाच्या चक्रविवहातून बाहेर पडून व्यसनमुक्त गाव होण्याच्या दिशेने वाटचाल होतांना दिसते. दारु विक्री खड्ड्यांचे समूळ उच्चाटन झाले खरे, परंतु खबरदारी म्हणून आता ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने लोकसहवाट्यातून आता गावात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी युद्धपातळीवर कामाला लागल्याचे वृत्त आहे. पोलीस निरीक्षक कराड यांच्या या भूमिकेमुळे वैतागलेल्या नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या असून इतर गावातही दारुमुक्तीचा संकल्प राबविण्याच्या मागणीने जोर धरलाय.

किनवट पोलीस ठाण्याच्या कार्यकक्षेतील अंबाडी गावातील जनलोकांच्या उत्स्फूर्त सहभागाने दारुविक्री मुक्त गाव होताना दिसते. एका संतापजनक घटनेची पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी गंभीर दखल घेतली. दारु विक्रेत्यांना कळते त्या भाषेत समजावून सांगितले. नागरिकांशी सुसंवादातून विश्वास निर्माण केला. लोकांच्या समस्या जाणून घेतल्या. ठोस पाऊल उचलून दारु विक्रीचे समूळ उच्चाटन करण्यात नागरिकांसह पोलीस प्रशासनाला यश मिळाले हे तत्वतः मान्य करावे लागणार आहे.पोलीस निरीक्षक कराड यांनी अंबाडी गावावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. परवाच नागरिकांसोबत विविध विषयांवर चर्चासुद्धा केली. पुर्वी दारु विक्रीचे अड्डे होते ते आज बंद असले तरी भविष्यात पुनर्जीवित होतील याबद्दलची सजगता म्हणून संवेदनशील क्षेत्र परिसरात आता सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी स्वयंस्फूर्त



लोकवाट्यातून हालचालींना वेग आला आहे. प्रायोगिक तत्त्वावर सुरुवातीला जवळपास सहा सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची शक्यता व्यक्तविली जात आहे. पोलीस निरीक्षक कराड यांनी बोधडी खुर्द, शनिवारपेठ सारख्या गावातील दारु विक्री खड्ड्यांच्या उच्चाटनासाठी लक्ष केंद्रित करण्याच्या मागणीने जोर धरलाय.

## आंबेडकरी नेते बापूसाहेब गजभारे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम

नांदेड/प्रतिनिधी-आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते तथा पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे प्रदेश महासचिव बापूसाहेब गजभारे



यांच्या वाढदिवसानिमित्त (५ जून) विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळच्या सत्रात खुरगाव येथील बुद्धिस्ट श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या प्रांगणात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात येणार आहे.नेरली येथील नंदनवन कुष्ठधाम येथे आमरस पुरणपोळीचे भोजन देण्यात येणार आहे व रयत रुग्णालय येथे फळे व चादर वाटप करण्यात येणार आहे. अशी माहिती वाढदिवस संयोजन समितीने दिली आहे.

# महसूलच्या कारभाराला दलालांचा विळखा;विद्यार्थ्यांसह शेतकऱ्यांची होत आहे लूट

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील ग्राम महसूल यंत्रणेचा कारभार पूर्णपणे कोलमडला असून शासकीय कामकाजाला खाजगी व्यक्तीचा विरखा पडल्याचा धक्कादायक प्रकार पहावाला मिळत आहे. आणि ग्राम महसूल अधिकारी स्वतः मुख्यालय हजर न राहता, शासकीय कामासाठी खासगी व्यक्तीची नियुक्ती करत आहेत. परिणामी, शैक्षणिक दाखल्यासाठी विद्यार्थी आणि खरीप पेरणीच्या तोंडावर कर्ज प्रकरणासाठी शेतकऱ्यांना महसूल कार्यालयाचे उंबरठे लागत आहेत.यात नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत.

गेल्या काही महिन्यापासून देगलूर तालुक्यातील अनेक महसूल कार्यालयामध्ये अधिकारी नियमित उपस्थित राहत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. परिणामी कार्यालयात बसलेल्या खाजगी व्यक्तीकडून अर्ज स्वीकारणे, कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी नागरिकांची आर्थिक पिळवणूक करीत आहेत. देगलूर तालुक्यातील हाणेगाव, मरखेल, करडखेड ,शहापूर, खानापूर, लोणी, म्हणून आदी तालुक्यातील अनेक गावांमध्ये हे समस्या अधिक तीव्र असल्याची चर्चा आहे. शेतकऱ्यांना सातबारा, आठ,-अ चे उतारे मिळण्यासाठी अनेक दिवस हेलपाटे मारावे लागत आहेत.तर विद्यार्थ्यांना उत्पन्न व रहिवाशी दाखवण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याने त्यांचे शैक्षणिक काम ही रखडत आहे.औ पेरणीच्या तोंडावर कर्जासाठी लागणारी कागदपत्रे वेळेत न मिळाल्याने शेतकरी हवालदार झाले आहेत. दरवानी या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने कडक भूमिका घेत सर्व अधिकाऱ्यांना तात्काळ मुख्यालय राहून कामकाज करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र जिल्हा प्रशासनाने दिलेल्या आदेशाला हे कर्मचारी केराची टोपली दाखवीत आहेत. आदेशाचे उल्लंघन केल्यास कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. पण या दिवस व वेळ दर्शविणारा फलक लावलेल्या वेळेवर हे कर्मचारी गावामध्ये उपस्थित राहत नाही त्यांच्या मर्जीवर येतात व जातात. ग्राम महसूल अधिकाऱ्याने मुख्यालय हे राहणे बंधनकारक आहे. तसेच शासकीय कामात खाजगी व्यक्तींची मदत घेण्यास महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार सक्त मनाई आहे. मात्र देगलूर तालुक्यात काही गावांमध्ये या नियमांना केराची टोपली दाखविली जात आहे. परिणामी नागरिकांची कामे खोडांबत आहेत. तालुक्यातील बहुतांश अधिकारी नांदेड, उदगीर, देगलूर यासारख्या शहरातून अपडाऊन करतात. सकाळी उशिरा येणे आणि दुपारी निघून जाणे, असा त्यांचा दिनक्रम बनला आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत जिल्हा प्रशासनाने आता कडक पावले उचलली पाहिजेत सर्व ग्राम महसूल अधिकाऱ्यांना तात्काळ मुख्यालय राहण्याची लेखी आदेश देण्यात यावेत अशी मागणी सर्व तालुक्यातील नागरिकाकडून होत आहे.

# शेतकऱ्यांना तात्काळ पीकविमा मंजूर करा;आ.अंतापूरकर यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

देगलूर/प्रतिनिधी-आ. जितेश अंतापूरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेत देगलूर बिलोली विधाससभा मतदारसंघातील प्रलंबित महसूल मंडळांतील शेतकऱ्यांना मंजूर पिकविमा रक्कम तात्काळ वाटप करण्याची मागणी केली आहे.

दरम्यान देगलूर तालुक्यातील सात पैकी फक्त चार महसूल मंडळांमध्येच पिकविमा रक्कम वितरित झाला आहे, तर देगलूर, खानापूर आणि मरखेल या विभागांतील शेतकरी अजूनही या लाभापासून वंचित आहेत. त्याचप्रमाणे, बिलोली तालुक्यातील बिलोली व कुंडलवाडी महसूल मंडळांतील शेतकऱ्यांना देखील पिकविमा रक्कम मिळालेली नाही. खरीप हंगाम तोंडावर आला असून, बियाणे, खते, औषधे आणि इतर आवश्यक वस्तू खरेदीसाठी आर्थिक मदत मिळवणे शेतकऱ्यांसाठी अत्यंत गरजेचे आहे. प्रलंबित पिकविमा रक्कम तात्काळ



वितरित झाल्यास, या शेतकरीवर्गाला मोठा दिलासा मिळेल आणि खरीप हंगामाची तयारी सुलभ होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे. आ.जितेश अंतापूरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे संबंधित विभागांनी त्वरित लक्ष देऊन, पिकविमा वाटप तात्काळ करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

## मुदखेड परिसरात वादळी वाऱ्यासह पाऊस

नांदेड/प्रतिनिधी-मुदखेड तालुक्यात आज (गुरुवार) दुपारी वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला आहे. पावसामुळे अनेक घरावरील पत्रे उडून गेली असून रस्त्यावरील झाडे उन्मळून पडली आहेत. राजवाडी, पिंपळकौठा मगरे, निवघा, बारड, वैजापूर पार्डी व अन्य भागातील केळीच्या बागा वाऱ्यामुळे आडव्या पडल्या आहेत.

पान १ वरुन

## नांदेड विधानपरिषद निवडणूकः...

शिवसेना उबाठा पक्षाचे जिल्हाप्रमुख ज्योतीबा खराटे, प्रविण पाटील चिखलीकर, पंकज गायकवाड या पाच जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. निवडणूक रिंगणात अमरनाथ राजूरकर, कृष्णा पाटील आष्टीकर व प्रशांत इंगोले हे तीन उमेदवार आहेत. विधानपरिषदेसाठी नांदेड जिल्ह्यात ४५२ मतदारांची संख्या असून दि.१८ जून रोजी मतदान होणार आहे.

## कट्टर विरोधक खा.अशोक चव्हाण व...

पक्षाच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी केली होती. महायुतीकडे नांदेडची जागा राष्ट्रवादीला सोडण्याची मागणी आम्ही नेत्यांकडे केली होती. वरिष्ठ नेत्यांच्या चर्चेमध्ये व जागा वाटपामध्ये नांदेडची जागा भाजपला सोडण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याशी चर्चा झाली आहे. महायुतीच्या नेत्यांनी घेतलेला निर्णय आम्हाला मान्य असून प्रविण पाटील चिखलीकर हे उमेदवारी अर्ज मागे घेणार आहेत. नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार अमरनाथ राजूरकर यांना राष्ट्रवादी काँग्रेस पूर्णपणे मदत करेल अशी ग्वाही आ.चिखलीकर यांनी दिली. यावेळी माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा, अमरनाथ राजूरकर, माजी आ.मोहनअण्णा हंबर्डे, माजी आ.सुभाष साबणे, ॲड.चैतन्य देशमुख, व्यंकटराव पाटील गोजेगावकर, शिवराज पाटील होटाळकर, प्रविण पाटील चिखलीकर, संतोष मुळे व इतर उपस्थित होते.

## डॉ.व्यंकटेश काब्दे यांना...

यांच्या नावाची घोषणा निवड समितीने केली असून समितीत सारंग टाकळकर, डॉ.रश्मी बोरीकर, डॉ. शिरीष खेडगीकर, सुरेश देशपांडे आणि डॉ. राजशेखर बालेकर यांचा समावेश होता. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्थेचे अध्यक्ष डी.के.देशमुख यांनी डॉ.काब्दे यांचे अभिनंदन केले आहे. यापूर्वी हा पुरस्कार स्वातंत्र्य सेनानी गंगाप्रसादजी अग्रवाल,डॉ.बद्रीनारायण बारवाले, झुल्फेकार हुसैन, भुजंगराव कुलकर्णी, शांताराम पंदेरे, डॉ.शशिकांत अहंकारी, डॉ.अशोक बेलखोडे, माधवराव चितळे, ओमप्रकाश वर्मा, रवि बापटले, अमर हबीब, डॉ. भालचंद्र कांगो आदी मान्यवरांना प्रदान करण्यात आला आहे. या महिन्यात नांदेड येथे डॉ.काब्दे यांना पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

# मान्सून केरळात दाखल;पुढील ४८ तासांत राज्यात आगमन

मुंबई/प्रतिनिधी- भारतीय हवामान विभागाने केरळमध्ये नैऋत्य मान्सून दाखल झाल्याची अधिकृत घोषणा केली असून आता महाराष्ट्राकडे मान्सूनची वाटचाल वेगाने सुरू झाली आहे. पुढील ४८ तासांत कोकण आणि दक्षिण महाराष्ट्रात मान्सूनपूर्व पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मात्र मराठवाडा आणि नांदेड जिल्ह्यातील नागरिकांना अजून काही दिवस प्रतीक्षा करावी लागणार असल्याचे चित्र आहे.

यंदा मान्सून केरळमध्ये नेहमीपेक्षा तीन दिवस उशिराने दाखल झाला. साधारणपणे १ जूनला केरळमध्ये पोहोचणारा मान्सून यंदा ३ जूनला दाखल झाला आहे. हवामान विभागाचे तज्ज्ञ प्रवीण कुमार यांच्या मते, पुढील दोन ते तीन दिवसांत गोवा, कोकण, दक्षिण महाराष्ट्र तसेच कर्नाटक आणि ईशान्य भारतातील काही भागांमध्ये मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी अनुकूल वातावरण तयार झाले आहे. मराठवाड्यात पुढील चार ते पाच दिवस ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता असून काही ठिकाणी मेघगर्जनेसह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. मात्र हा पाऊस मान्सूनचा नसून मान्सूनपूर्व किंवा अवकाळी स्वरूपाचा असेल. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीबाबत घाई करू नये, असा सल्ला हवामान विभागाने दिला आहे. हवामान विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार, नांदेडसह मराठवाड्यात मान्सूनचे आगमन १२ ते १६ जूनदरम्यान होण्याची शक्यता आहे. मान्सूनच्या पुढील हालचाली आणि वातावरणातील बदलांनुसार या तारखांमध्ये काहीसा बदल होऊ शकतो.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४